प्रभात पुणे, सोमवार, दि. १९ फेब्रुवारी २०१८

# राजगुरू विद्यालयात 'सायबर गुन्हेगारी'वर संवाद

**पुणे** - हुतात्मा राजगुरू विद्यालय आणि ज्युनियर कॉलेजमध्ये बिकहील आणि पंख यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर गुन्हेगारी या विषयावर पोलिसांशी थेट संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बिकहील सीएसआर प्रमुख अजय शिर्के यांनी सायबर गुन्हे कसे घडतात आणि ते थांबविण्यासाठी आपण काय केले पाहिजे या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी मुलांच्या शंकांचे निरसन केले. दामिनी पथकातील महिलांनीही मार्गदर्शन करताना, मुलगा किंवा मुलगी असली तरी त्यांच्यासाठी कायदा समान आहे, गुन्हेगाराला शिक्षा होतेच असे सांगितले. रयत शिक्षण संस्थेच्या पश्चिम विभाग प्रमुख आणि हुतात्मा राजगुरू विद्यालयाचे प्राचार्य चंद्रकांत जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. त्यांनी पंख मार्फत घेतल्या जाणाऱ्या जीवनमूल्ये प्रशिक्षणाचा विद्यार्थ्यांना चांगला उपयोग होत असल्याचे मत मांडले. पंख संस्थेच्या अध्यक्षा स्मिता आपटे, राजगुरू विद्यालयातील शेटे मॅडम आणि इतर शिक्षकही कार्यक्रमाला उपस्थित होते.